Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad - 431 004. Maharashtra (India)
NAAC 'A' Grade

# NATIONAL SERVICE SCHEME

Not Me But You

**Dr. Rajesh Karpe** (M.A. SET. Ph. D.)
Programme Co-ordinator
Mobile : 8275092478

Ref. No. NSS/ 2016/5257-5309

Date : 27/7/2016 29

प्रति,
मा.प्राचार्य/कार्यक्रमाधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना सर्व संलग्नित महाविद्यालये,
औरंगाबाद शहर,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**विषय : ऑगस्ट महिन्यापासून सुरु होणाऱ्या हेरिटेज वॉकसाठी उपस्थित राहणे बाबत..**

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, मा.कुलगुरू महोदयांनी सूचित केल्याप्रमाणे व उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार ऐतिहासिक औरंगाबाद परिसराची जडणघडण,उभारणी तसेच विविध कला व संस्कृतीचा विकास इत्यादी ऐतिहासिक ठेवा या बाबतची माहिती सर्वांना कळावे या उद्देशाने "औरंगाबाद पर्यटन प्रतिष्ठाणच्या " वतीने ऑगस्ट महिन्यापासून हेरिटेज वॉक उपक्रम सुरु करण्यात येत आहे.

हेरिटेज वॉक प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार या दिवशी आयोजन करण्यात येणार आहे. हेरिटेज वॉकची वेळ सकाळी ७.०० ते ९.०० वाजेपर्यंत अशी असणार असून यात शहरातील ऐतिहास तज्ञ,शिल्पकार,स्थापत्य तज्ञ,कलाकार,पर्यटन व्यावसायिक, उद्योजक, व्यापारी, डॉक्टर,वकील,प्राध्यापक,शिक्षक,विद्यार्थी,शासनाचे व महानगरपालिकेचे विविध महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्राध्यापक,शिक्षक,विद्यार्थी,अधिकारी तसेच औरंगाबाद शहरात आलेले पर्यटकहि या हेरिटेज वॉक मध्ये विशेष निमंत्रीक म्हणुन असतील. इतिहासाची माहिती करुन घेऊ इच्छीणारे सर्व नागरिकही सामील होवू शकतात.

हेरिटेज वॉक सोबतच त्या पर्यटन स्थळाची पाहाणी करुन ते पर्यटन स्थळ पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आवश्यक ते उपाय करणे बाबतीतही नियोजन करण्याचे काम करावयाचे आहे. तसेच ऐतिहासिक वारसा जतन करणे, जोपासणे या करीता नागरीकांचा सहभाग घेवून कार्य करण्याबाबतीत उपाय करणे व श्रमदानाच्या माध्यमातुन या स्थळाची माहिती वाढविणे बाबतीतचे कार्य करावयाचे आहे.

पहिला हेरिटेज वॉक दि. ६ ऑगस्ट २०१६ रोजी येत असून हा हेरिटेज वॉक सोनेरी महल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, परिसर येथे सकाळी ७.०० ते ९.०० वा.या वेळेत होईल.

या पुढील हेरिटेज वॉकचे ठिकाण व तारखा बाबतची माहिती सोबत जोडली आहे.करीता विनंती की, आपल्या माविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी सर्वांनी या उपक्रमात सहभागी व्हावे

कार्यक्रम समन्वयक

# हेरिटेज वॉकचे ठिकाण व तारखा बाबतची माहिती

| अ. क्र. | तारीख | ठिकाण |
|---|---|---|
| १ | दि. ०६/ ०८ /२०१६ | " सोनेरी महल "<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. |
| २ | दि. २० / ०८ /२०१६ | नौखंडा पॅलेस |
| ३ | दि. ०३/ ०९ /२०१६ | सिध्दार्थ उद्यान |
| ४ | दि. १७/ ०९ /२०१६ ऐवजी<br>दि. १८/ ०९ / २०१६ | मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय |
| ५ | दि. ०१/ १० / २०१६ | औरंगाबाद लेणी |
| ६ | दि. १५ / १० / २०१६ | बिबी-का-मकबरा, पानचक्की, मकाई गेट, रंगीन दरवाजा, दिल्लीगेट, भडकल गेट. |
| ७ | दि. ०५ / ११ /२०१६ | सलीम अली सरोवर |
| ८ | दि. १९/ ११ / २०१६ | नहर – ए – अंबरी |
| ९ | दि. ०३ / १२ /२०१६ | छत्रपती शिवाजी महाराज वास्तु संग्रहालय |
| १० | दि. १७/ १२ /२०१६ | गुलशन महल |

In. No. 2564
(Gen. Admin.)
Date 26/7/16
DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY * AURANGABAD *

Inward No. 876
Office of the V.C. Sec.
Date 25-7-16
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

जा.क्र.मपविम/प्राकाऔ/औ.प.प्र./२०१६
मपविम, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
दिनांक:- १६/०७/२०१६

137
राष्ट्रीय सेवा योजना
दि. 27/7/16
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

प्रति,

मा. डॉ. बी. ए. चोपडे
कुलगुरु
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

औरंगाबाद परिसरास ऐतिहासिक महत्व असुन वाकाटक, यादव, सातवाहन या घराण्याची समृध्दीने भरभराटीस आलेली वैभवशाली सत्ता होती. तसेच मध्य युगीन कालखंडात अनेक राजे, बादशहा, सुभेदार, सरदार यांच्या ऐतिहासिक कालखंडात औरंगाबाद परिसरात अनेक सांस्कृतिक परिवर्तन होत गेले व या शहराची जडणघडण कालानुरुप बहरत गेली. याच ४०० ते ५०० वर्षाच्या ऐतिहासिक कालखंडाचे कालावधीत अनेक राजवाडे, स्मारके, वारसास्थळे, बगीचे, भव्य प्रवेशव्दार यांचे विविध शैलीतील वास्तुची उभारणी रचनाकाराणी, शिल्पकारांनी, स्थापत्यकारांनी केलेली आहे.

ऐतिहासिक औरंगाबाद परिसराची जडणघडण, उभारणी तसेच विविध कला व संस्कृतीचा विकास इत्यादी ऐतिहासिक ठेवा या बाबतची माहिती सर्वांना असावी व यातुन औरंगाबादचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, पौराणिक महत्व सर्वांना कळावे या उद्देशाने " **औरंगाबाद पर्यटन प्रतिष्ठाणच्या** " वतीने " ऑगस्ट महिन्या पासून हेरिटेज वॉक " उपक्रम सुरु करण्यात येत आहे.

" **हेरिटेज वॉक** " प्रत्येक महिन्याचा पहिला व तीसरा शनिवार या दिवशी आयोजन करण्यात येणार आहे. " **हेरिटेज वॉक** " ची वेळ सकाळी ७.०० ते ९.०० वाजेपर्यंत अशी असणार असुन यात शहरातील इतिहास तज्ञ, शिल्पकार, स्थापत्य तज्ञ, कलाकार, पर्यटन व्यावसायिक, उद्योजक, व्यापारी, डॉक्टर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शासनाचे व महानगरपालीकेचे, विविध महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्राध्यापक, शिक्षक, अधिकारी, तसेच औरंगाबाद शहरात आलेले पर्यटकही या हेरिटेज वॉकमध्ये विशेष निमंत्रीत म्हणुन असतील. इतिहासाची माहिती करुन घेऊ इच्छीणारे सर्व नागरिकही सामील होवू शकतात.

"**हेरिटेज वॉक**" सोबतच त्या पर्यटन स्थळाची पहाणी करुन ते पर्यटन स्थळ पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आवश्यक ते उपाय करणे बाबतीतही नियोजन करण्याचे काम करावयाचे आहे. तसेच ऐतिहासिक वारसा जतन करणे, जोपासणे या करीता नागरीकांचा सहभाग घेवून कार्य करण्याबाबतीत उपाय करणे व श्रमदानाच्या माध्यमातुन या स्थळाची महती वाढविणे बाबतीतचे कार्य करावयाचे आहे.

पहिला हेरिटेज वॉक दि. ६ ऑगस्ट २०१६ रोजी येत असुन हा " **हेरिटेज वॉक** ". "**सोनेरी महल**" डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर येथे सकाळी ७.०० ते ९.०० वा. या वेळेत होईल.

या पुढील हेरिटेज वॉकचे ठिकाण व तारखा बाबतची माहिती सोबत जोडली आहे.

करीता विनंती की, आपल्या सर्व सदस्यांसह या उपक्रमात सहभागी व्हावे.

| वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक | आयुक्त, | विभागीय आयुक्त |
|---|---|---|
| मपविम, औरंगाबाद | महानगरपालीका, औरंगाबाद | औरंगाबाद विभाग औरंगाबाद. |

Registrar: circulate to all faculty + Mon. Teaching

DSW / NSS

27/07/2016